MHPA110006342025

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, गंगाखेड, जि. परभणी यांच्या न्यायालयात.

नियमीत दिवाणी दावा क्र.३१८/२०२५

अंगद नामदेव दणदने.

विरुध्द

तहसीलदार व ईतर.

नि.क्र.०५ वरील आदेश.
( पारीत दिनांक १७.११.२०२५ )

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे अंतरिम मनाई हुकूम मिळणेसाठी सादर करण्यात आलेला आहे. त्या अर्जावर प्रतिवादींतर्फे म्हणणे सादर करण्यात आलेले आहे. वादीतर्फे विधिज्ञ श्री.के.ए. टेंगसे, प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री.एस.डी. वाकोडकर, श्री.ए.ए. सावंत, श्री.एस.डी. तरकसे आणि श्री.एस.एस. मुंढे यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावर उपलब्ध असलेले दस्तऐवजांचे अवलोकन करण्यात आले. वादीतर्फे असे नमुद करण्यात आले की, प्रतिवादींतर्फे चुकीच्या बाबी नमुद करुन तहसीलदार यांच्याकडे दिनांक ०६.०१.२०२५ रोजी अर्ज करण्यात आला. तहसीलदार यांनी वस्तुस्थितीचा विचार न करता व कोणतेही पुरावे नसताना गावातील राजकारणाच्या प्रभावाखाली आदेश पारीत केले व त्याद्वारे वादीच्या ०१ आर क्षेत्रावर जोशी समाजासाठी स्मशानभुमीची नोंद सातबारावर घेतली. प्रतिवादींनी

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by
YADAV GAJANAN
BHANUDAS
Date: 2025.11.17
17:02:13 +0530

कोणत्या कायद्याखाली अर्ज दाखल केला, हे त्यामध्ये काहीही नमुद नसताना बेकायदेशीर आदेश तहसीलदार यांनी पारीत केले आहेत. तथाकथीत दानपत्र हे नोंदणीकृत नसताना व अपु–या मुद्रांकावर असताना देखील त्याआधारे आदेश पारीत केले. दानपत्र हे कोणत्याही मोबदल्याशिवाय असते, मात्र प्रतिवादींच्या कथनानुसार मोबदला घेऊन दानपत्र करुन दिलेले आहे. त्यामूळे ते दानपत्र नाही. तथाकथीत दानपत्रावर नावे ही हस्तलिखीत आहेत. जर ते दानपत्राच्या दिवशी लिहीण्यात आली असती, तर ती टंकलिखीत झाली असती. ते दानपत्र कोणासमक्ष लिहून देण्यात आले, याबद्दल कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. तथाकथीत दानपत्राच्या १५ वर्षांनी प्रस्तुतचा वाद उपस्थित करण्यात आलेला आहे. प्रतिवादी जे जोशी समाजाचे आहेत, त्यांच्या पैकीच ज्ञानोबा सरोदे व अशोक राजाराम भोसले यांच्याकडे शेती असताना देखील ते लोक भुमीहीन आहेत, असे खोटे कथन करण्यात आले, त्याचप्रमाणे शासनाची ४० एकर गायराण जमीन असताना व त्यांच्याकडे पर्यायी व्यवस्था असताना देखील, गाव पातळीवरील राजकारणातून व भावकीच्या वादातून ते आदेश पारीत करण्यात आलेले आहेत. वादीने तहसीलदार यांच्या आदेशाविरुध्द एस.डी.ओ. यांच्याकडे अपील दाखल केलेले असून ते प्रलंबीत आहे. त्या आदेशाआधारे प्रतिवादी हे वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळे करीत आहेत. वादीने प्रथम दर्शनी केस शाबीत केलेली असून न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे. जर प्रतिवादींविरोधात मनाई हुकूम पारीत करण्यात आला नाही, तर वादीस अपरिमीत असे नुकसान होईल. करीता वादीचा अर्ज मंजुर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.11.17 17:02:25 +0530

**०२–** प्रतिवादींतर्फे श्री.एस.डी. तरकसे यांनी अर्जास प्रखर विरोध नोंदवत असे नमुद केले की, प्रतिवादी हे जोशी समाजाचे असून ते भटक्या व विमुक्त प्रवर्गात मोडतात. त्यांच्याकडे शिक्षणाचा, ज्ञानाचा अभाव आहे. त्यांच्याकडे अंत्यविधीसाठी जागा नाही, शासकीय कार्यालयाचे ज्ञान नाही. त्यामूळे त्यांनी वादीच्या वडिलांकडून दानपत्र करुन घेतले. वादीने हरकत अडथळे केल्यामूळे प्रतिवादींना जाग आली. हेच त्यांच्या अशिक्षीतपणाचे लक्षण आहे. तहसीलदार यांनी तलाठी, ग्रामविकास अधिकारी, पोलीस पाटीस अशा सर्व लोकसेवकांचे जबाब नोंदवून निष्पक्षपणे आदेश पारीत केलेला आहे. वादीचे वडिल हयात असेपर्यंत कोणतीही तक्रार किंवा वाद निर्माण झाला नाही. त्यानंतर वादीने त्रास देण्यास सुरुवात केलेली आहे. वादीने विनाकारण प्रस्तुतच्या प्रकरणास जातीय रंग देण्याचा प्रयत्न केलेला आहे. जोशी समाजाचे कोणत्या व्यक्तीचा मृत्यु झाला तरच त्या ठिकाणी जाणे होते. त्यामूळे प्रतिवादी हे वादीस हरकत अडथळे करीत आहेत, असे म्हणता येणार नाही. प्रतिवादींनी ०१ आर क्षेत्राचा ताबा मागीतलेला नाही. गावातील ज्येष्ठ व्यक्तींनी व वादीच्या भावकीतील लोकांनीच शपथपत्र सादर केलेले आहे की, त्या ०१ आर क्षेत्रावर अंत्यविधी केले जातात. त्यामूळे वादीने प्रथम दर्शनी केस शाबीत केलेली नाही व न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजुने नाही. परिणामतः वादीस अपरिमीत नुकसान संभवत नाही. करीता वादीचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

**०३–** उभयपक्षांचा युक्तिवाद व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावरुन पुढील मुद्दे माझ्यासमक्ष उपस्थित होतात व त्यावर माझे निष्कर्ष मी खाली दिलेल्या कारणमिमांसेआधारे नोंदवित आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.11.17 17:02:37 +0530

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १– | वादीने प्रथमदर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | ...नकारार्थी. |
| २– | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे का ? | ...नकारार्थी. |
| ३– | मनाई हुकूम न दिल्यास वादीस अपरिमीत नुकसान संभवते का ? | ...नकारार्थी. |
| ४– | आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्र.१ ते ३ करीताः–**

**०४–** अभिलेखावर जे वादकथन व कागदपत्रे सादर करण्यात आलेली आहेत, त्यावरुन असे दिसून येत आहे की, वादीने प्रस्तुतच्या अर्जामध्ये प्रतिवादींनी अडिहरकती करु नयेत, तसेच स्मशानभुमीची अंमलबजावणी करु नये अशी मागणी केलेली आहे. अभिलेखावर उभयपक्षांतर्फे जे सातबारा उतारे, फेरफार उतारे व शपथपत्रे सादर केलेली आहेत, त्या सर्वांवरुन असे दिसून येत आहे की, वादीचे नाव हे वाद मिळकतीवर फेरफार क्र.४६० अन्वये लावण्यात आल्याचे दिसून येत आहे. फेरफार क्र.४६० चे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, ती नोंद अनोंदणीकृत संमतीपत्राआधारे घेण्यात आलेली आहे. असे असताना देखील वादीतर्फे सखाराम दणदने, काशीनाथ दणदने, बंडु दणदने, त्रींबक दणदणे व प्रभाकर दणदने यांनी दिलेल्या शपथपत्रामध्ये वादीस वाटपाद्वारे मिळकत मिळाल्याचे नमुद करण्यात आलेले आहे. अभिलेखावर ज्या दानपत्राआधारे तहसीलदार यांनी सातबारा उता–यावर नोंद घेतलेली आहे त्या दानपत्राची

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.11.17 17:02:49 +0530

छायांकीत प्रत उपलब्ध आहे. त्यावरुन ते दानपत्र शंभर रुपयांच्या मुद्रांकावर नोंदविण्यात आल्याचे दिसून येत आहे. तो दस्त देखील अनोंदणीकृत आहे. वादीतर्फे असे कथन करण्यात आले की, वादीचे वडिल नामदेव गणपती दणदने हे अंगठा करत नव्हते, तर ते सही करत होते. मात्र वादीस संधी देऊनही फेरफार क्र.४६० मध्ये नमुद संमतीपत्र दाखल केलेले नाही. ज्यावरुन हे स्पष्ट झाले असते की, वादीचे वडिल सही करत होते की अंगठा. वादीचे नाव ज्या दस्ताआधारे सातबारा उता–यावर आलेले आहे, ते दस्त देखील अनोंदणीकृत असल्याचे फेरफार क्र.४६० वरुन दिसून येत आहे व दानपत्र देखील अनोंदणीकृत असल्याचे दिसून येत आहे. त्यामूळे दोन्ही दस्त अनोंदणीकृत असताना वादी असे म्हणू शकत नाही की, प्रतिवादींचे दस्त अनोंदणीकृत व अपु–या मुद्रांकावर आहेत, त्यामूळे त्यास महत्व देण्यात येऊ नये. जेंव्हा वादी व प्रतिवादी या दोघांचे दस्त अनोंदणीकृत आहेत, अशा परिस्थितीत दोन्ही दस्तांना एकाच त–हेची वागणूक देणे योग्य ठरेल.

**०५–** वादीने प्रस्तुतच्या अर्जामध्ये स्मशानभुमीची अंमलबजावणी करु नये अशी मागणी केलेली आहे. मात्र अभिलेखावर उपलब्ध असलेल्या सातबारा उतारे व फेरफार वरुन असे दिसून येत आहे की, दिनांक १३.०६.२०२५ रोजी फेरफार क्र.७१५ मंजुर करण्यात आला व मौजे आनंदवाडी येथे गट/सर्वे क्र.२५५/१ च्या ईतर अधिकारात जोशी समाजासाठी मयत व्यक्तींचे अंत्यविधी पार पाडण्याकरीता स्मशानभुमीसाठी ०१ आर क्षेत्र अशी नोंद घेण्यात आलेली आहे. यावरुन हे स्पष्ट होत आहे की, तहसीलदार यांच्या आदेशाची अंमलबजावणी झालेली आहे. त्यामूळे अंमलबजावणी करु नये ही वादीची मागणी निष्फळ ठरत आहे. वादीतर्फे माहीती देण्यात आल्याप्रमाणे तहसीलदार यांच्या आदेशाविरोधात एस.डी.ओ. यांच्याकडे अपील दाखल करण्यात

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.11.17 17:03:01 +0530

आलेली आहे व ती प्रलंबीत आहे. महाराष्ट्र जमीन महसुल संहितेच्या कलम १५७ अन्वये फेरफाराची माहीती ही जोपर्यंत बाजुला करण्यात येत नाही, तोपर्यंत सत्य व बरोबर असल्याचे ग्राहय धरण्यात येते. त्याच संहितेच्या कलम १५८ अन्वये फेरफारांच्या नोंदीविरोधात दिवाणी दावा दाखल करण्यास मनाई करण्यात आलेली आहे. त्यामूळे जोपर्यंत फेरफार क्र.७१५ हा महसुल विभागातून बाजुला करण्यात येत नाही, तोपर्यंत त्या नोंदीविरोधात कोणतेही आदेश या न्यायालयास देता येणार नाहीत.

**०६–** वादीस दानपत्राची माहीती झाल्यानंतर देखील तो दानपत्र रद्दबातल आहे किंवा वादीवर बंधनकारक नाही किंवा बेकायदेशीर आहे, अशी कोणतीही मागणी वादीने दाव्यात केलेली नाही व दानपत्रास आव्हानीत केलेले नाही. वादीतर्फे करण्यात आलेल्या युक्तिवादाप्रमाणे जोशी समाजाच्या ईतर व्यक्तींकडे शेत जमीनी आहेत हे दर्शविण्यासाठी त्यांनी सातबारा दाखल केलेले आहेत, मात्र जेंव्हा जोशी समाजाने मोबदला देऊन ०१ आर क्षेत्राचे दानपत्र करुन घेतलेले आहे, अशा परिस्थितीत निश्चितपणे ते त्या क्षेत्रावर अंत्यविधी करण्यास आग्रही असतील. ही बाब वादादीत नाही की, तहसीलदार यांना स्मशानभुमीसाठी शासकीय जागेतून जागा प्रदान करता येते. मात्र ज्या समाजाकडे त्यांनी स्वतःसाठी क्षेत्र मोबदला देऊन विकत घेतलेले आहे तेंव्हा ते निश्चितपणे शासकीय जागेतून मागणी करण्याचे कोणतेही कारण नाही. त्या गावामध्ये किंवा गावाशेजारी गायराण क्षेत्र नाही, असे कोणाचेही म्हणणे नाही. मात्र जेंव्हा अर्जदारांनी त्यांनी विकत घेतलेल्या जागेची नोंद सातबारा उता–यावर घेण्याची विनंती केली असताना, तेंव्हा तहसीलदारांनी त्याबाबतच निकाल देणे अपेक्षीत आहे. त्या ठिकाणी तहसीलदारांनी खाजगी

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.11.17 17:03:12 +0530

मालमत्ता सोडून शासकीय जागेतून स्मशानभुमीसाठी जागा देणे म्हणजे अर्जात केलेल्या मागणीपेक्षा वेगळी मागणी मंजुर करण्यासारखे होईल. प्रतिवादींतर्फे सुरेश सदाशिव भोसले, कौशल्याबाई बापूराव जाहीर, वादीच्या भावकीतील देवराव दणदने, बळीराम राघोजी दणदने व महादेश भोळे यांची शपथपत्रे सादर केलेली आहेत. त्या सर्वांनी सांगीतल्याप्रमाणे त्या ०१ आर क्षेत्रावर जोशी समाजाचे अंत्यविधी केले जातात. कौशल्याबाईच्या शपथपत्रानुसार त्या ०१ आर क्षेत्रावर तिची आई मुक्ताबाई व भाचा सुनिल गेजगे यांचा अंत्यविधी झालेला आहे. त्याचप्रमाणे देवराव दणदने यांनी देखील शपथेवर निवेदन केले आहे की, त्या ठिकाणी झालेल्या चार ते पाच अंत्यविधीला तो हजर होता.

**०७–** या सर्व बाबींचा विचार करता, असे दिसून येत आहे की, वादीने दानपत्रास आव्हानीत न करता एका प्रकारे दानपत्रास मूकसंमती दिल्याचे स्पष्ट होत आहे. तहसीलदार यांनी सर्व लोकसेवकांचे जबाब नोंदवून, तसेच स्थळपाहणी करुन निर्णय दिलेला आहे. तो सध्या एस.डी.ओ., गंगाखेड यांच्याकडे न्यायप्रविष्ट आहे. फेरफार क्र.७१५ ही मंजुर करण्यात येऊन तहसीलदार यांच्या आदेशाची अंमलबजावणी झालेली आहे. प्रतिवादी हे निश्चितपणे फक्त अंत्यविधीकरीता त्या ठिकाणी जात असल्यामूळे त्यांचा संबंध फक्त ०१ आर पुरताच येतो व त्यामूळे ते वादीच्या संपुर्ण ५७ आर क्षेत्रास अडिहरकती करत आहेत, असे म्हणता येणार नाही. या सर्व घटनाक्रमावरुन वादीने प्रथम दर्शनी केस शाबीत केलेली आहे असे म्हणता येणार नाही. न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजुने नाही. जर मनाई हुकूम देण्यात आली, तर निश्चितपणे जोशी समाजांच्या लोकांना त्यांनी मोबदला देऊन दानपत्र करुन घेतलेल्या मिळकतीवर अंत्यविधी

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by
YADAV GAJANAN
BHANUDAS
Date: 2025.11.17
17:03:25 +0530

करता येणार नाही. अंत्यविधी हा अत्यंत संवेदनशील मुद्दा आहे. जर त्या समाजाच्या लोकांनी मोबदला देऊन दानपत्र करुन घेतले नसते, तर निश्चितपणे त्यांना तहसीलदारांकडे स्मशानभुमीसाठी जागेची मागणी करता आली असती. त्यामूळे मनाई हुकूम पारीत न केल्यास वादीस कोणताही अपरिमीत धोका संभवत नाही. त्या उलट एखाद्या समाजाचा भावनिक व संवेदनशील प्रश्न निर्माण होईल. त्यामूळे मी मुद्दा क्र.१ ते ३ वर निष्कर्ष नकारार्थी नोंदवून पुढीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

१– अर्ज नि.क्र.०५ नामंजुर करण्यात येत आहे.

२– अर्जाचा खर्च वादीवर.

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.11.17 17:03:36 +0530

**दिनांकः–** १७.११.२०२५

**( गजानन भा. यादव ),**
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, गंगाखेड.